सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 249 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 25 / 06 / 2025

# शहर वाहतुक शाखा वजिराबाद व इतवारा नांदेड यांनी चार चाकी, ॲटोरिक्षा, टु व्हिलर वाहनांची कागदपत्रे तपासणी, अवैध प्रवाशी वाहतुक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी वाहतुक करणारे ॲटो यांचेवर मोहिम राबवुन एकुण 5,30,200 /—रूपयाचा दंड आकारण्यात आला

नांदेड शहरात वाढत असलेल्या वाहतुक समस्या दुर करण्यासाठी नांदेड शहरातील चार चाकी, ॲटोरिक्षा, टु व्हिलर वाहनांचे कागदपत्र तपासणी मोहिम राबविण्या बाबत **मा. श्री.अबिनाश कुमार** पोलीस अधीक्षक नांदेड यांनी आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने दिनांक 24.06.2025 रोजी वजिराबाद शहर वाहतुक शाखेतर्फे वाहतुक शाखेचे अधिकारी अंमलदार व दंगा नियंत्रण पथकातील अंमलदार यांचे समवेत वजिराबाद चौक, कलामंदीर, महावीर चौक, रेल्वे स्टेशन, हिंगोली गेट येथे चार चाकी, ॲटोरिक्षा, टु व्हिलर वाहनाचे सर्व कागदपत्र, ईन्शुरन्स, वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेट, अवैध प्रवाशी वाहतुक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी वाहतुक करणारे ॲटो व सर्व वाहनांचे परमिट / परवाना (लायसन्स) कागदपत्राची तपासणी करून विशेष मोहिम राबविण्यात आली. तपासणी दरम्यान अपुर्ण कागदपत्रे, ट्रिपल सिट व युनिफॉर्म परिधान न केलेले ॲटोरिक्षा, टु / फोर व्हिलर चालक व वाहनावर मोटार वाहन कायद्याप्रमाणे एकुण 285 केसेस करून 3,53,650 / —रू चा दंड आकारण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे इतवारा शहर वाहतुक शाखेतर्फे वाहतुक शाखेचे अधिकारी अंमलदार व दंगा नियंत्रण पथकातील अंमलदार यांचे समवेत जुना मोंढा, हबीब टॉकीज, देगलुर नाका, बर्की चौक येथे चार चाकी, ॲटोरिक्षा, टु व्हिलर वाहनाचे सर्व कागदपत्र, ईन्शुरन्स, वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेट,अवैध प्रवाशी वाहतुक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी वाहतुक करणारे ॲटो व सर्व वाहनांचे परमिट व परवाना (लायसन्स) कागदपत्राची तपासणी करून तसेच रोडवर लागलेले हातगाडे व अस्ताव्यस्त लागलेले वाहने यांचेवर विशेष मोहिम राबविण्यात आली. तपासणी दरम्यान अपुर्ण कागदपत्रे,ट्रिपल सिट व युनिफॉर्म परिधान न केलेले ॲटोरिक्षा, टु / फोर व्हिलर चालक व वाहनावर मोटार वाहन कायद्याप्रमाणे एकुण 144 केसेस करून 1,76,550 / —रू चा दंड आकारण्यात आला आहे.

वजिराबाद शहर वाहतुक शाखा व इतवारा शहर वाहतुक शाखा यांनी मिळुन नांदेड शहरातील चार चाकी, ॲटोरिक्षा, टु व्हिलर वाहनाचे सर्व कागदपत्र, ईन्शुरन्स, वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेट,अवैध प्रवाशी वाहतुक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी वाहतुक करणारे ॲटो व सर्व वाहनांचे परमिट व परवाना (लायसन्स) कागदपत्राची तपासणी करून विशेष मोहिम राबवून 429 केसेस करून **एकुण 5,30,200 / —रूपयाचा दंड** आकारला आहे.

सदरची कामगीरी **मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोनि साहेबराव गुट्टे, वजिराबाद शहर वाहतुक शाखा व पोनि श्री जगन पवार, इतवारा शहर वाहतुक शाखा, स्टॉफ व दंगा नियंत्रण पथकातील अंमलदार यांनी केली आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड